"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 03, Issue: 06, Nov. – Dec. 2016 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) - 4.567

# "उस्मानाबाद जिल्ह्यातील गूळ उत्पादक शेतकऱ्यांचा अभ्यास"

संशोधक विद्यार्थी
**बाळासाहेब गौरिशंकर पाटील**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद
मो.नं.९८२२३५७६२२

मार्गदर्शक
**डॉ.राम.आर.सोलंकर**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
आदर्श महाविद्यालय, उमरगा, जि.उस्मानाबाद
मो.नं.९४२१९१७३०३

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील ७० टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. २०१३-१४ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात १७.२ टक्क्याहून अधिक वाटा शेती क्षेत्राचा आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेतेला शेतीचा कणा म्हटले जाते. महाराष्ट्रात गहु, ज्वारी, बाजरी, भूईमुग, कापूस, ऊस पिकांचे उत्पादन घेतल्या जाते. ऊस हे एक प्रमुख नगदी पीक असून त्याच्या एकूण ऊस उत्पादनापैकी ४० टक्के ऊस गूळ आणि खांडसरी तयार करण्यासाठी वापरतात. गूळ उत्पादन हे शेतीशी निगडीत उद्योग असून हे एक लघु उद्योग आहे. गूळ आणि साखर उत्पादनासाठी ऊस या पिकाचा कच्चा माल म्हणून वापर केला जातो. गूळ हे मानवी आहारात व प्राण्यासाठी आयुर्वेदिकदृष्टया महत्वाचे आहे. त्याचबरोबर साखर या उत्पादनाला पर्यायी उत्पादन म्हणून ही गुळाचा वापर केला जातो. भारतात प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात, बिहार, झारखंड इत्यादी राज्यामध्ये गुळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात केले जाते.

महाराष्ट्र राज्य हे प्रगतिशील राज्य असून महाराष्ट्रात कोल्हापुर, सांगली, पुणे, अहमदनगर, लातुर, उस्मानाबाद जिल्ह्यात साखरेबरोबर मोठ्या प्रमाणात गुळाचे उत्पादन घेतले जाते. कोल्हापूरनंतर उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकरी गूळ उत्पादनातून आर्थिक, सामाजि आणि शैक्षणिक प्रगती साधताना दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्यात साधारणत: ३०-४० टक्के ऊसापासून गुळाचे उत्पादन घेतले जाते. साखरकारखानदार ऊसाला योग्य आधारभूत किंमत न मिळणे असो किंवा ऊस वेळेवर घेवून जाण्याचा प्रश्न असो, त्यातून शेतकऱ्याची पिळवणूक होत आहे. म्हणून येथील शेतकरी गूळ उत्पादनातून आपली प्रगती साधताना दिसून येते.

"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 03, Issue: 06, Nov. – Dec. 2016 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) - 4.567

उस्मानाबाद जिल्ह्यात गुळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात असून येथील गूळ हे पुणे, सोलापूर, अहमदनगर, इंदापुर, हैदराबाद या ठिकाणच्या बाजारपेठेला पुरविला जातो. जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी व शेजमजूर एकत्र येवून शेतामध्ये गुऱ्हाळाच्या माध्यमातून गुळाचे उत्पादन घेतात. हे उद्योग जिल्ह्यातील तुळजापूर, लोहारा, उमरगा, कळंब, उस्मानाबाद, भुम, परांडा तालुक्यतील ग्रामीण शेतकरी स्वतःच्या मालकीचे व भाडेतत्वार इतर शेतकऱ्यांचे ऊसापासून गुळाचे उत्पादन घेतले जाते. त्यातून जिल्ह्यातील शेतकरी आणि शेतमजूरांना रोजगार उपलब्ध होवून हंगामी बेकारीचे प्रमाण घटले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील वाहतुक व रोजगार वाढून गूळ उत्पादकांची आर्थिक व सामाजिक प्रगती होताना दिसून येते. त्यातून ग्रामीण भागाच्या विकासास चालना मिळते. म्हणून गूळ उत्पादन हे शेतकऱ्यांना फायदेशीर आहे. गूळ उत्पादनातील आर्थिक प्रगती व समस्यांचा शोध घेवून रोजगार, वाहतूक ग्रामीण भागातील ऊस व गूळ उत्पादकांची आर्थिक व सामाजिकदृष्ट्या अभ्यास करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१) उस्मानाबाद जिल्ह्यातील गूळ उत्पादक शेतकऱ्यांचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२) गूळ उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
३) उत्तम प्रतिचे गूळ तयार करण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर केला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे.

**✶ उस्मानाबाद जिल्ह्यातील गुळ उत्पादन :**

उस्मानाबाद जिल्हा ७.५६९ कि.मी. क्षेत्रफळाने वसलेला असून त्यात ८ तालुके व ७२९ गावे आहेत. येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आणि शेतीशी निगडीत अनेक

व्यवसाय केले जाते. उस्मानाबाद जिल्ह्यात ज्वारी, हरभरा, भूईमुग, तुर, गहू असे अनेक पीक घेतले जात असून ऊस या नगदी पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. येथे उत्पादित होणाऱ्या ऊसाचे साखर कारखान्याला कच्चा माल म्हणून पुरवठा केला जातो. त्याचबरोबर साखरेप्रमाणे जिल्ह्यातील तुळजापूर, लोहारा, उमरगा, कळंब तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात गूळ तयार करतात. येथील उत्पादित होणाऱ्या गुळाला मोठ्या प्रमाणात मागणी असून सोलापूर, अहमदनगर, इंदापूर, पुणे, हैदराबाद, लातूर येथील बाजारपेठेला पुरवठा केला जातो. गूळ उत्पादन हे शेतकऱ्यांना व उद्योजकांना फायदेशीर असून त्याची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती होत आहे. जिल्ह्यातील शेतकरी आपल्या शेतात गुऱ्हाळघर स्थापन करुन स्वतःचे व इतर शेतकऱ्याचे भाडे तत्वावर गूळ तयार केला जातो, हे गूळ उद्योग प्रामुख्याने ग्रामीण भागात असून शेतकरी व शेतमजूरांना रोजगार उपलब्ध होवून हंगामी बेकारीचे प्रमाण घटले आहे. ग्रामीण विकासाला चालना मिळून कामगारांचे आर्थिक, सामाजिक व त्याच्या पाल्यांची शैक्षणिक स्थिती सुधारताना दिसून येते.

गुळ उद्योग हे कमीत कमी गुंतवणूकीत सुरु करता येतो. त्यासाठी लागणारे साधने हे ग्रामीण भागात उपलब्ध असून शेतकरी ऊस वाहतुकीसाठी बैलगाडी, ट्रॅक्टरचा वापर करतो. उत्पादित होणाऱ्या गुळाला साखर कारखान्यापेक्षा जास्तीची किंमत मिळून आर्थिक फायदा मिळतो. गूळ उद्योगात निर्माण होणाऱ्या टाकाऊ कच्चा माल इंधन, खते, पशुखाद्य, मादकपदार्थ इत्यादींसाठी वापर केला जातो. एका गूळ उद्योगात साधारणतः १७-१८ कामगार काम करत असतात. त्याचबरोबर गुळ उद्योगात रोज ७-८ टन ऊस गाळप केला जातो. प्रतिटन ऊसामागे २ क्विटंल गूळ तयार होतो व १ क्विटंल गुळामागे २५००/- ते ३०००/- पर्यंत किंमत मिळते. त्यातून वाहतुक, विक्रीखर्च व गूळ तयार करण्यात येणारा खर्च वजा करता प्रति टनामागे शेतकऱ्याला ३०००/- पर्यंत नफा मिळतो. जे कारखान्यापेक्षा फायदेशीर आहे. म्हणून गूळ उत्पादन उद्योग आर्थिकदृष्ट्या नेहमीच फायदेशीर आहे.

**✶ उस्मानाबाद जिल्ह्यातील गूळ उत्पादनातील समस्या :**

गूळ उत्पादन जरी शेतकऱ्यांना व उद्योजकांना फायदेशीर असले तरी गूळ उत्पादन करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

१) उस्मानाबाद जिल्ह्यातील गूळ व्यवसायिकांना आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागते.
२) गूळ उत्पादनासाठी लागणाऱ्या पाणी आणि मजुराच्या समस्या असल्याचे दिसून येते.
३) गूळ उत्पादक शेतकऱ्यांना वाहतुक, बाजापेठेच्या समस्यांना सामोरे जावे लागते.
४) गूळ उद्योगाप्रती शासनाचे धोरण उदासीन आहे.
५) गूळ उत्पादकांना बाजारपेठेतील किंमतीच्या चढ-उताराला सामोरे जावे लागते.
६) गूळ संशोधन केंद्राविषयी माहिती नसणे.

**✶ उत्तमप्रतीचे गुळ बनविण्यासाठी उपाय :**

१) गूळ उद्योजकांनी गुळ संशोधन केंद्राविषयी माहिती घेवून आधुनिक पध्दतीने गूळ तयार केले पाहिजे, ज्यामुळे त्यांचा आर्थिक फायदा होईल.
२) उत्तम व पिवळाधम्मक गूळ तयार करण्यासाठी नवनवीन ऊसाच्या जातीचा वापर केला पाहिजे.
३) गूळ उद्योगात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे, जेणेकरुन कमी खर्चात गूळ उत्पादन होण्यास मदत होते.
४) गूळ उत्पादनाला शासनाच्या माध्यमातून आधारभूत किंमत जाहीर केली पाहिजे.
५) गूळ उद्योजक यांनी सेंद्रीय गूळ तयार केला पाहिजे, त्यातून सेंद्रीय गुळाला जास्तीची किंमत मिळेल.

**समारोप :**

उस्मानाबाद जिल्ह्यात गुळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात असून येथील शेतकरी साखर कारखान्याला ऊस पुरवठा करण्याबरोबर गुळाचे उत्पादन ही मोठ्या प्रमाणात करतात. गूळ

उद्योग हे ग्रामीण भागात असून शेतकरी व शेतमजूर कौशल्य विकसित करुन गुऱ्हाळाच्या माध्यमातून गुळ तयार केला जातो. ग्रामीण भागातील बेरोजगारांना हंगामी स्वरुपात रोजगार उपलब्ध होऊन बेकारीचे प्रमाण घटते. गुऱ्हाळात निर्माण होणारा टाकाऊ कच्चा माल हा इंधन, खते, पशुखाद्य, मादकपदार्थ बनविण्यासाठी वापर केला जातो. म्हणून गूळ उद्योग हे फायदेशीर असून शेतकऱ्यांची व उद्योजकांची आर्थिक प्रगती होते.

**संदर्भ सुची :**


१) रविंद्र काटोळे, (२०१४), "फायदेशीर ऊस शेती", गोडवा कृषि प्रकाशन, पुणे-९.

२) डॉ. राजेंद्र सिंह तोमर, (२०१५), "गन्ने की खेती : बेहतर उपज और आमदानी कैसे", इंदिरा गांधी कृषि, विश्वविद्यालय, रायपुर (छत्तीसगड).

३) दैनिक सकाळ, १५ फेब्रुवारी-२०१६.

४) दैनिक अॅग्रोवन, ०६ नोव्हेंबर २०१३.

5) Rupe, S.S. (2007), "Growth and Prospect to Jaggery Industry in Kolhapur District Unpublished Ph.D. Thesis, Shivaji University, Kolhapur.

6) PVT Jagannnadha Rao and Das (207), Jaggery-ATraditional Indian Sweetenar, Indian Journal of Traditional Knowledge Vol.6 (1), PP 95-102.

7) www. Agro won.Com

8) www.Agri-Co-Op-hic.in